# राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री यांच्यातील सत्तासंघर्ष

**कु. शीतल लक्ष्मणराव रोकडे .**संशोधक विद्यार्थी, शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था अमरावती.

shitalrokade097@gmail.com

**प्रस्तावना : कॉविड 19 मुळे भारतासह जगाचे व्यवहार थांबले आहेत. महाराष्ट्र तर कोविड 19 चे हब झाले आहे. देशात सर्वाधिक रुग्ण महाराष्ट्रात आहे. महाराष्ट्र कोविड 19 च्या संकटाला सामोरे जात असताना महाराष्ट्रात राज्यपाल आणि मुख्यमंत्री यांच्यात संघर्ष शिगेला पोहोचला होता / आहे. ममता बनर्जी यांच्या पश्चिम बंगाल मध्येही तो सुरु आहे. आपण भारतात संसदीय लोकशाही स्वीकारली आहे. यात केंद्रात पंतप्रधान हा वास्तविक शासक तर राष्ट्रपती हा नाममात्र शासक आहे. घटक राज्यातही आपण तीच व्यवस्था स्वीकारली आहे.राज्यात मुख्यमंत्री हा वास्तविक शासक तर राज्यपाल हा नाममात्र शासक असतो. राज्याच्या राजकारणात सत्ताधारी आणि विरोधक असा संघर्ष स्वाभाविक असतो. परंतु,काही राज्यात मुख्यमंत्री आणि राज्यपाल असा संघर्ष पहायला मिळतो. ज्या घटकराज्यात विरोधी पक्षांचे सरकार असेल तेथे तो संघर्ष प्रकर्षाने दिसून येतो. सध्यस्थितीत केंद्रात ब्मोदींच्या नेतृत्वात भाजपचे सरकार आहे तर महाराष्ट्रात शिवसेना,कॉग्रेस,राष्ट्रवादी कॉग्रेस मिळून महाविकास आघाडीचे सरकार आहे आणि प. बंगाल मध्ये ममता बनर्जी यांच्या तृणमूल कॉग्रेसची सत्ता आहे.तर , दिल्ली अरविंद केजरीवाल यांच्या आम आदमी पक्षाची सत्ता आहे. त्यामुळे भाजप विरोधी सरकार असलेल्या राज्यात मुख्यमंत्री विरुद्ध राज्यपाल असा संघर्ष सुरु आहे. महाराष्ट्रात सत्तास्थापनेच्या आधीपासून सुरु आहे. राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री हा संघर्ष काही तसा नवीन नाही संविधान लागू झाल्याच्या काही वर्षापासून तो सुरु आहे. घात्क्रज्यात जनतेने निवडून दिलेले सरकार असताना राज्यपाल आणि मुख्यमंत्री असा संघर्ष का निर्माण व्हावा असा प्रश्न अनेकांना पडतो. तेव्हा राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री असा सत्तासंघर्ष याचा उहापोह करण्याचा प्रयत्न करूया.**

**1.राज्यपालांचे स्वविवेकाधीन अधिकार :- संविधानानुसार राज्यपाल घटक राज्याचा घटनात्मक प्रमुख आहे. घटनात्मक प्रमुख म्हणून राज्यपालांकडे काही अधिकार व कर्तव्य दिली आहेत. त्याअधिकाराशिवाय राज्यपालांना अनुच्छेद १६३ (१) व (२) मध्ये मुख्यमंत्र्यांच्या सल्ल्याशिवाय कारभार करण्यासाठी विवेकाधीन शक्ती बहाल केली आहे. याला राज्यपालांचा स्वविवेकाधीन अधिकार, विवेकाधीन शक्ती,** Discretionary Power **म्हणतात. या अधिकारावरुनच अनेक राज्यात राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री असा संघर्ष सुरु आहे.**

**संविधानाच्या अनुच्छेद**163 (1) There shall be a council of Ministers at the head to aid and advice the Governor in the exercise of his function,except in so far as he is by or order under this constitution required to exercise his functions or any of them in his discretion.

(2) If any question arises weather any matter is or is not a matter as respects which the Governor in his discretion shall be final,and the validity of anything done by the Governor in his discertion shall not be called in question on the ground that he ought or ought not to have acted in his discretion.

(3) The question whether any,and if so what,advice was tendered by Ministers to Governor shall not be inquired into in any court.

**संविधानाच्या अनुच्छेद १६३ (१) व (२) नुसार राज्यपालांना मिळालेल्या विवेकाधीन शक्तीत,**

**१) राज्य विधिमंडळाने पारित केले एखादे विधेयक राष्ट्रपतींच्या संमतीसाठी राखून ठेवणे,**

**२) राज्यातील घटनात्मक सरकार आपले सरकार चालविण्यास असमर्थ आहे असा समज राज्यपालांचा झाल्यास त्या राज्यात राष्ट्रपती शासन लागू करण्यास राष्ट्रपतींकडे शिफारस करणे,**

**३) राज्यात विधानसभा निवडणुकीत कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही, किंवा कार्यरत मुख्यमंत्र्यांचा अचानक मृत्य झाला, किंवा विधानसभेत मुख्यमंत्र्यांनी बहुमत गमावले अशा परिस्थितीत मुख्यमंत्री पदासाठी कोणाला पाचारण करावे हे ठरविण्याची 'विवेकाधीन शक्ती' राज्यपालाला आहे.**

**राज्यपालांना मिळालेल्या विवेकाधीन शक्तीचा अनेकवेळा गैरवापर केल्यामुळे राज्यपालांच्या विवेकाधीन शक्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्या जाते ? संविधान सभेतही राज्यपालांना स्वविवेकाधीन शक्ती असावी का? असा प्रश्न उपस्थित केल्या गेला होता. सर्वोच्च न्यायालयाने कर्नाटक(२०१८) व महाराष्ट्र (२०१९) प्रकरणी राज्यपालांच्या विवेकाधीन शक्तीवर लगाम लावणारे निर्णय दिले आहेत. तरीही राज्यपालांच्या वर्तनात बदल होत**

नसल्याचे महाराष्ट्र व पच्छिम बंगालमध्ये सुरु असलेल्या राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री यांच्यातील संघर्षावरून दिसून येते. संसदीय लोकशाही स्वीकारलेल्या देशात राज्यपाल व मुख्यमंत्री यातील संघर्ष गैर आहे. आपण लोकांनी निवडून दिलेल्या घटनात्मक सरकारकडे केंद्र/ राज्याची वास्तविक सत्ता बहाल केली आहे. असे असताना राज्यपाल व मुख्यमंत्री यांच्यात संघर्ष का निर्माण व्हावा हा प्रश्न आहे? आपण संसदीय लोकशाही स्वीकारली. संसदीय लोकशाहीत सरकारे येतात - जातात. अशास्थितित राज्यात घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाला असेल, राज्यात त्रिशंकु स्थिती असेल तर त्यातून कसा मार्ग काढावा म्हणून राज्यपालांना विशेषाधिकार बहाल केला आहे. मुख्यमंत्र्यांची निवड करणे व राष्ट्रपतींच्या संमतीसाठी काही विधेयके राखून ठेवणे या दोन अधिकारावरुन राज्यपाल व मुख्यमंत्री असा संघर्ष पाहायला मिळतो.

2.विरोधी राज्यातच विवेकाधीन शक्तिचा वापर :- ज्या स्वविवेकाधीन अधिकारामुळे राज्यपाल आणि मुख्यमंत्री यात संघर्ष आहे तो देशभर सारखाच असावयास हवा होता. परंतु, ज्या घटकराज्यात विरोधी पक्षाचे सरकार आहे त्या घटकराज्यातच असा संघर्ष दिसून येतो. केंद्रात व राज्यात एकाच पक्षाचे सरकार असेल तेथे दिसून येत नाही.याचा अर्थ राज्यपाल स्वविवेकाधीन अधिकाराचा वापर करताना गैरवापर करतात हे स्पष्ट होते. एका राजकीय अभ्यासकांच्या मते (सन्दर्भ ८), केंद्रात व राज्यात एका पक्षाचे सरकार असेल तेथील राज्यपालांचा 'स्वविवेक' केंद्रसरकारकडे 'फ्रीज' असतो. तर केंद्रात एका पक्षाचे आणि राज्यात विरोधी पक्षाचे सरकार असेल तर त्या राज्यातील राज्यपालांचा स्वविवेक 'अ‍ॅक्टीवेट' होतो. मागील सहा/सात दशकांच्या अभ्यासातून हेच स्पष्ट होते की, राज्यातील विरोधी पक्षांचे सरकार पाडण्यासाठी आणि विरोधी पक्षाची सत्ता असलेल्या राज्यात सरकार आणण्यासाठी प्रयत्न करणे.तेथे राष्ट्रपती राजवट लावणे. उदा. महाराष्ट्रात सत्ता स्थापनेचा पेच निर्माण झाला तेव्हा तेथे भाजपा ची सत्ता यटी नाही ऐसे वाटल्यावरुन महाराष्ट्रात राष्ट्रपती राजवट लावली होती. आणि सत्ता येत आहे असे वाटताच् एका रात्रित राष्ट्रपती राजवट उठवून राज्य साखर झोपेत असताना पहाटे-पहाटे देवेंद्र फडणवीस यांचा शपथविधी पार पाडला होता. त्यासाठी राजभवन रात्रभर जागे होते. अशाप्रकारे अनेक राज्यातील विरोधी पक्षाची बहुमतांची सरकारे उलथवून लावण्यासाठी राज्यपालांनी 'स्वविवेकाधीन' अधिकारांचा गैरवापर केला आहे.

विरोधी सरकार असलेल्या राज्यातच राज्यपाल असे का वागतात असा प्रश्न अनेकांना पडतो. त्याचे उत्तर राज्यपालांच्या नियुक्तीत दिसून येते. सरकारिया कमिशनने राजकारणात सक्रीय असलेल्या व्यक्तींची निवड राज्यपाल पदी करू नये अशी शिफारस केली होती. इतकेच नव्हे तर तो राज्यपाल केंद्रातील सत्ताधारी पक्षाशी संबंधित व्यक्ती असू नये अशीही शिफारस केली होती. तसेच राज्यपालाची निवड केंद्र सरकारने न करता स्वतंत समिती मार्फत करावी यात पंतप्रधाना व्यतिरिक्त लोकसभा अध्यक्ष आणि राज्यांच्या मुख्यमंत्र्यांचा समावेश असावा. असा सल्ला दिला. परंतु आजवरचा अनुभव असा सांगतो की, राज्यपाल हे पद पक्षातील पडीत पक्षनेत्याना राजकीय उभारी देणारे पद झाले आहे. व त्या राज्यपालांनी संविधान, घटनात्मक संकेताला न जुमानता आपल्या पक्षनेत्यावर निष्ठा ठेवूनच राज्यपाल पदाचे वहन केले आहे.. परिणामत राज्यपाल पद राजकीय नेत्यांचा अड्डा बनला आहे. आजकाल अनेक राज्यपाल पक्षाचे निष्टावान सदस्य असल्यासारखे वागतात. राजस्थान चे राज्यपाल कल्याणसिंग यांनी तर मी भाजपचा निष्ठावान कार्यकर्ता असल्याचे म्हटले. त्यामुळे राज्यपाल हे केवळ एक व्यक्ती नसून संविधानिक संस्था आहे, या घटनात्मक संस्थेला उणेपण येईल / डाग लागेल असे वर्तन राज्यपालांकडून घडू नये अशी माफक अपेक्षा राज्यापालाकडून असते, मात्र ती अपेक्षा फोल ठरली. संविधानिक संस्था म्हणून राज्यपालपद एक गरिमापूर्ण पद आहे, परंतु राज्यपालांच्या अशा वर्तनामुळे त्यापदाचे अवमूल्यन होत आहे.

घटकराज्यातील दूसरे सत्ताकेंद्र :- महाराष्ट्रात विधानपरिषद निवडणुकीच्या निमित्ताने सुरु झालेला मुख्यमंत्री विरुद्ध राज्यपाल यांच्यातील संघर्ष विधानपरिषद निवडणुकीने शमला तरी त्या संघर्षाचा पुढचा अंक विद्यापिठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा घ्याव्यात की घेवू नये यावरून झाला होता. युजीसिनेच अंतिम वर्षाच्या परीक्षा घेवू नयेत असे जाहीर केल्याने तो वाद हि संपला असला तरी राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री हा वाद अजून संपलेला नाही. त्याची खदखद 'राजभवन सचिवालयाच्या' निमित्ताने सुरूच आहे.असाच वाद पश्चिम बंगाल राज्यातही दिसून येतो. पश्चिम बंगाल मध्ये ममता बनर्जी यांच्या तृणमूल कॉंग्रेस ची सत्ता आहे. नजीकच्या काळात तेथे विधानसभा निवडणुका आहेत. भाजप त्या राज्यात सत्तेवर येण्याची महत्वाकांक्षा बाळगून आहे. यातून

**त्या राज्यात राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री हा संघर्ष पाहायला मिळतो आहे. पश्चिम बंगालमध्ये मुख्यमंत्री ममता बनर्जी व राज्यपाल जगदीप धनखर यांच्यात संघर्ष सुरु आहे. कोविड 19 चे संकट असताना ही तो संघर्ष तीव्र आहे. प.बंगाल मध्ये येवू घातलेली विधानसभा निवडणूक याची पार्श्वभूमी आहे असे मानल्या जाते. यात ,**

**१) राज्यपालांनी प.बंगाल विधानसभेने पारित केलेले विधेयक मंजूर केले नाही असा ममता बनर्जी यांचा आरोप आहे. तर राज्यपालांनी विधानसभा लायब्ररीला भेट देण्यासाठी वेळ मागूनही विधानसभा अध्यक्षांनी दोन दिवसासाठी विधानसभा स्थगित करून राज्यपालांसाठी राखीव असलेल्या तीन नंबर गेटला लॉक लावले. परिणामी राज्यपालांना गेटवरच ताटकळत थांबावे लागले होते.**

**२) राज्यपालांनी राज्यात दौरे करण्याचा सपाटा लावल्याने ते दुसरे सत्ताकेंद्र होऊ पाहते आहे, असा आरोप करीत मुख्यमंत्र्यांनी राज्यपालांना हेलीकॉप्टर दिले नव्हते. राज्यपालांना हेलीकॉप्टर ऐवजी ६०० किलोमीटर कारने प्रवास करावा लागला होता. यावरून हा संघर्ष वाढत गेला.राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांना दोन पत्रे दिली.आणि काही ट्विट केले. त्यावर मुख्यमंत्री ममता बनर्जी यांनी ही राज्यपालांना पत्र लिहिले. त्या पत्रात .ममता बनर्जी यांनी राज्यपालावर कोरोनाव्हायरसच्या संकटकाळात राज्याची 'सत्ता हडप' करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप केला. त्या म्हणतात, राज्यपालानी जनतेद्वारे निर्वाचित मुख्यमंत्र्याबाबत जे शब्द वापरले वापरले जातात ते भारताच्या घटनात्मक आणि राजकीय इतिहासामध्ये अभूतपूर्व म्हणावे लागेल?**

**मी,माझे मंत्रिमंडळातील सहकारी व अधिकारी यांच्या विरोधात राज्यपाल जे बोलले ते अपमानकारक,आणि निंदनीय आहेत. पुढे त्या पत्रात मुख्यमंत्री म्हणाल्या की, 'संकटाच्या या घटनेत , मी तुम्हाला विनंती करते की, सत्ता हस्तगत करण्याच्या प्रयत्नापासून आपण थांबले पाहिजे . तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमाने सतत ट्विट करता त्यापासून दूर राहावे. महाराष्ट्र व प.बंगाल या दोन राज्यातील राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री असा सत्ता संघर्ष पाहता राज्यपाल पदावरील व्यक्तींनी तय पडला शोभेल असे वर्तन केले नाही. तत्पूर्वी कर्नाटक प्रकरणी वजुभाई वाला यांनी केंदाला अपेक्षित वर्तन केले. विशेष म्हणजे यातील अनेक राज्यपाल हे माजी मुख्यमंत्री राहिलेले आहेत.**

**3.संविधानसभेत राज्यपालांच्या 'विवेकाधीन शक्ती' वर चर्चा :- राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री यांच्यातील सत्तासंघर्ष पाहता संविधान सभेत राज्यपालांना दिलेल्या अधिकाराबाबत काय चर्चा झाली त्यांचा काय उद्देश होता हे पाहणे गरजेचे आहे. संविधानसभेत झालेली चर्चा खूप मोठी असल्याने काही सदस्यांचे मत याठिकाणी जाणून घेवू व त्यावर आंबेडकरांचे काय मत होते ते पाहू. संविधानसभेचे सदस्य ब्रजेश्वर मिश्र यांनी म्हटले की, एकीकडे संविधांनाच्या अनुच्छेद १६३ मध्येच आपण राज्यपालांना त्यांच्या कामात मदत व सल्ला देण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वात मंत्रीपारीषद असेल व त्यांच्या सल्ल्याने राज्यपाल काम करतील असे म्हटले आहे. तर, त्याच वेळी आपण राज्यपालांना स्वविवेकाधीन शक्ती बहाल करतो.ते लोकशाही विरोधी आहे, आपण त्यापासून दूर झालो पाहिजे असे मत मांडले. मिश्र यांच्या मताप्रमाणे अनेकांनी आपण लोकशाही युगात असल्याचे म्हटले, राज्यपालांना स्वविवेकाधीन अधिकार हा अथोरेटरीयन लोकशाही (हुकुमशाही)ला जन्म देतो. त्यामुळे राज्यपालांना स्वविवेकाधीन अधिकार देवू नये असे म्हटले. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी मात्र राज्यपालांना विवेकाधीन शक्ती आवश्यक असल्याचे म्हटले होते. शिवाय राज्यपाल हे गव्हर्नर जनरल प्रमाणे मंत्रिमंडळ बैठकीच्या अध्यक्षस्थानी असावेत असा सल्ला ही दिला होता.संविधान सभेत राज्यपालांचे अधिकार आणि विवेकाधीन शक्तीवर झालेल्या चर्चेला उत्तर देताना संविधान सभेत डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात.**'The Governor under the Constitution has no functions which he can discharge by himself: no functions at all. While he has no functions, he has certain duties to perform and I think the House will do well to bear in mind this distinction. This article certainly, it should be borne in mind, does not confer upon the Governor the power to overrule the Ministry on any particular matter. Even under this article, the Governor is bound to accept the advice of the Ministry.'

**हे जरी खरे असले तरी, राज्यपालांना मंत्रिमंडळ निवडण्याचा अधिकार दिला आहे. यात,**"The Governor's ministers shall be appointed by him and shall hold office during his pleasure."So he has the power to appoint his ministers. But when the ministers are not in existence who shall advise him in the

discharge of his functions? When he dismisses his ministry then also the will exercise his functions under his own discretion.

Then again. when the Governor calls upon the leader of a party for the choice of ministers, after a previous ministry has been dissolved, in that case there will be no ministry in existence; and who will be there to advise him? Therefore he will be exercising his functions in his discretion. It is wrong to assume that the Governor will not be charged with any functions which he will exercise in his discretion. Article 175 and 188 are the other article which give him certain functions which he has to exercise in his discretion.

**त्याशिवाय राष्ट्रपतींनाही न दिलेली विवेकाधीन शक्ती राज्यपालांनाच का दिली यावर बोलताना डॉ.आंबेडकर म्हणतात**, Of course there is because we do not want to vest the President with any discretionary power. Because the provincial Governments are required to work in subordination to the Central Government, and therefore, in order to see that they do act in subordination to the Central Government the Governor will reserve certain things in order to give the President the opportunity to see that they do act in subordination to the Central Government the Governor will reserve certain things in order to give the President the opportunity to see that the rules under which the provincial Governments are supposed to act according to the Constitution or in subordination to the Central Government are observed.

**आपण भारताच्या राष्ट्रपतीना स्वविवेकाधीन अधिकार देत नाही आणि दुसरीकडे राज्यपालांना स्वविवेकाधीन अधिकार देत आहोत याचे आश्चर्य वाटते असा प्रश्न संविधान सभेतील सदस्यांनी उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना आंबेडकर म्हणतात, त्याचे कारण असे की, आपल्याला कोणत्याही विवेकी शक्तीसह राष्ट्रपतींना बांधून घेण्याची इच्छा नाही, त्यांनी मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानेच वागले पाहिजे,परंतु, प्रांतीय सरकारांना (घटकराज्यांना) केंद्र सरकारच्या अधीन राहून काम करणे आवश्यक आहे,आणि म्हणून ते केंद्र सरकारच्या अधीन राहून काम करतात किंवा नाही हे पाहण्यासाठी राज्यपालांना राष्ट्रपतींना संधी मिळवून देण्यासाठी काही गोष्टी राखून ठेवल्या पाहिजेत. यामुळे प्रांतीय सरकार संविधानानुसार किंवा केंद्र सरकारच्या अधीन राहून काम करतात की नाही हे पाहिले जाईल. तसेच "राज्यपाल मुख्यमंत्री, मंत्री त्यांची नेमणूक करतील आणि त्यांच्या मर्जीअसेपर्यंत ते पदावर असतील." असे घटनेत नमूद आहे. त्यामुळे मंत्र्यांची नेमणूक करण्याची शक्ती त्याच्यात आहे. परंतु, मंत्रीमंडळच अस्तित्वात नसताना राज्यपालांना कामकाजाच्या वेळी कोण सल्ला देईल? जेव्हा राज्यपालांनी मंत्रीमंडळ बरखास्त केले अशास्थितीत ते स्वत:च्या विवेकाने कार्य करतील.त्याशिवाय, जेव्हा राज्यपाल एखाद्या पक्ष नेत्याला मुख्यमंत्री पदासाठी बोलावतात, तेव्हा पूर्वीचे मंत्रिमंडळ बरखास्त झाल्यामुळे तेथे कोण राज्यपालांना सल्ला देईल? म्हणून ते आपल्या निर्णयावर अवलंबून कार्य करतील. यासाठी राज्यपालांना विवेकाधीन शक्ती दिली आहे. अशारितीने संविधानकारांचा राज्यपालांना विवेकाधीन शक्ती देण्यामागे देशात संघवाद टिकून राहणे हा होता असे दिसून येते. आपण संसदीय लोकशाही स्वीकारली आहे. यात संघराज्य व्यवस्था स्वीकारली, त्यामुळे केंद् व राज्य सरकार अस्तित्वात आले. केंद्र व राज्याचे अधिकार हे सुद्धा घटनेने निश्चित केले आहेत. तरीही घटकराज्यांतील विधीमंडळाना कायदा करण्याचा अधिकार आहे. या अधिकारांचा वापर करताना घटकराज्यांनी फुटून निघण्याचा कायदा पारित केला, किंवा केद्रविरोधी कायदा पारित केला आणि राज्यपालांना स्वविवेकाधीन शक्ती नसेल तर राज्यपालांना त्या कायद्यावर सही केल्यावाचून गत्यंतर नाही.अशास्थितीत संविधानाने जे फेडरल प्रारूप निर्माण केले त्याला तडा बसू शकतो. आपण केंद्रानुवर्ती सरकार निर्माण करताना मुद्दामून 'फेडरल' ऐवजी 'युनियन' हा शब्द प्रयोग केल्यामुळे घटक राज्यांना फुटून निघण्याचा अधिकार नाही. असे असले तरी अनेक घटक राज्यांत स्वतंत्र राज्यांची मागणी केली आहे. यात पंजाबमध्ये खलिस्तानची मागणी, दक्षिणेकडील प्रांतात द्रविड स्थानची मागणी, उत्तर पूर्व भागात बोडोलैंड,नागालैंडची मागणी आहे. नागालैंड ने तर स्वत:चा ध्वज निर्माण केला आहे. त्यामुळे संविधानकारांचा राज्यपालांना विवेकाधीन शक्ती देण्यामागे भारताच 'फेडरल स्ट्रक्चर' टिकून राहावा हा उद्देश होता, हे लक्षात येते. राज्यपालांनी मात्र आपल्या या उद्देशाला हरताळ फासून विवेकाधीन शक्तींचा गैरवापर केला आहे.**

**सारांश :- संविधान सभेतील चर्चा व संविधानातील तरतुदी आणि राज्यपालांचे वर्तन लक्षात घेता राज्यपालांना विवेकाधीन शक्ती देण्यामागे राज्यात घटनात्मक पेच निर्माण झाला असेल, मंत्रिमंडळ अस्तित्वात नसेल.घटक**

**राज्यातील विधिमंडळाने संविधानविरोधी किंवा केंद्र सरकारच्या धोरणाविरुद्ध कायदा पारित केला असेल तर, अश्यावेळी विवेकाधीन शक्ती वापरण्याचा अधिकार दिला होता. राज्यपाल ही केवळ व्यक्ती नसून ती संविधानिक संस्था आहे. परंतु, संविधानिक पदावरील राज्यपालांनी या उद्देशाला हरताळ फासून 'विवेकाधीन शक्तींचा' गैरवापर केल्याचे दिसून येते. महाराष्ट्र,कर्नाटक प्रकरणी सर्वोच्च न्यायालयाने राज्यपालांच्या निर्णयावर लगाम लावला आहे.तरीही राज्यपालांच्या विवेकाधीन शक्तीवर निश्चित मर्यादा आणण्यासाठी केन्द्र सरकारने कायदा करणे गरजेचे झाले आहे. भारताचे 'फेडरल स्ट्रक्चर' टिकून राहण्यासाठी ते आवश्यक आहे. त्याशिवाय राज्यपालांची निवड करणाऱ्यानी आणि राज्यपाल पदावर आरूढ होणाऱ्यांनी संविधान सभेतील राज्यपालांच्या अधिकारावरील चर्चा जरी नीट वाचली तरी घटक राज्यात राज्यपाल विरुद्ध मुख्यमंत्री असा जो संघर्ष सुरु आहे तो निवळण्यास मदत होईल.त्यासाठी संबंधित राज्यात त्यांना समजेल अशा भाषेत संविधान सभेतील चर्चेचे भाषांतर करून राजभवनात ठेवाव्यात. संविधानसभेत बोलताना डॉ. आंबेडकर म्हणाले होते की, राज्यपाल हे काही एका पक्षाचे प्रतिनिधी नाहीत, तर ते राज्यातील जनतेचे प्रतिनिधीत्व करतात. परंतु , सध्यस्थितीत राज्यपालांचे वर्तन हे केवळ आणि केवळ केंद्रात सत्तेवर असलेल्या पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते यापलीकडे गेले नाही, राजस्थानचे राज्यपाल कल्याणसिंग यांनी तर मी भारतीय जनता पक्षाचा सच्चा कार्यकर्ता असल्याचे जाहीर केले. संस्थात्मक पातळीवरील व्यक्तीकडून होणारे असे वर्तन हे दुर्दैवी तसेच संविधान विरोधी आहे.**

संदर्भ :

1. Constituent Assembly Debate Volume VIII, 2 june,1949
2. Constituent Assembly Debate Volume IX,1st August 1949
3. https://aajtak.intoday.in/story/coronavirus-maharashtra-university-exams-governor-letter-chief-minister-uddhav-thackeray-1-1196981.html
4. .https://khabar.ndtv.com/news/india/shiv-sena-gave-advice-to-bjp-on-the-issue-of-university-examination-2240684
5. https://khabar.ndtv.com/news/india/maharashtra-new-tussle-governor-upset-with-the-higher-and-technical-education-minister-2233704
6. https://maharashtratimes.com/career/career-news/university-exams-ugc-suggests-different-pattern-of-exams/articleshow/75799840.cms
7. https://maharashtratimes.com/career/career-news/ugc-exam-guidelines-amid-corona-update-to-be-revised/articleshow/76552423.cms
8. https://dandepradip.blogspot.com/2020/05/blog-post_7.html
9. https://www.bbc.com/hindi/india/2014/08/140827_shifting_of_governor_analysis_vr
10. https://www.outlookhindi.com/politics/mandate/what-does-sarkaria-commission-says-in-formation-of-government-in-the-case-of-hung-assembly-27184
11. https://www.newindianexpress.com/nation/2019/nov/05/maharashtra-crisis-governor-bs-koshyaris-role-also-comes-into-sharp-focus-2057346.html
12. https://economictimes.indiatimes.com/news/politics-and-nation/maharashtra-supreme-court-orders-floor-test-before-5-pm-tomorrow/articleshow/7223
13. https://www.thehindu.com/news/national/sc-orders-maharashtra-floor-test-on-nov-27/article30084368.ece
14. https://www.indiatoday.in/news-analysis/story/koshyari-ki-hoshyari-right-or-wrong-but-no-illegality-in-what-he-did-in-maharashtra-1622981-2019-11-27
15. https://maharashtratimes.com/maharashtra/mumbai-news/university-exams-shiv-sena-accuses-bjp-of-double-standards/articleshow/75963074.cms